सर्वसाधारण बदल्या सन 2020 प्राधान्य
...लमर्यादित

386
जाक्रं/जिप/साप्रवि/आस्था-4/कावि/ /2020
सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद परभणी
दिनांक -13 जुलै, 2020

प्रति,

1. सर्व विभाग प्रमुख जिल्हा परिषद परभणी---------------
2. सर्व गट विकास अधिकारी/गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती ----------------------
3.उप अभियंता जि.प.उप विभाग (बाधंकाम/ल.पा/ग्रापापू) सर्व
4.तालुका वैद्यकीय अधिकारी पंचायत समिती (सर्व)
5.बाल विकास प्रकल्प अधिकारी, एबाविसेयो (सर्व)

**विषय :- सर्वसाधारण बदल्या सन 2020 बाबत.**

संदर्भ :-1)ग्राम विकास विभाग,शा. नि. क्रमांक :जिपब-414/प्र.क्र.112/आस्था-14,दि 15 मे 14
2)सा. प्र. वि.,शा. नि. क्र :एसआरव्ही-2020/प्र.क्र.30/कार्या.12 दि 07 जुलै 2020
3)ग्रा. वि. विभाग, पत्र क्र संकीर्ण-2020/प्र.क्र.282/आस्था-14 दिनांक- 09 जुलै, 20

उपरोक्त विषयी संदर्भीय 1 च्या शासन निर्णयाचे प्रकरण 1 मधील परि. 08 (12) अन्वये जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या बदल्या सामान्यपणे वर्षातुन एकदाच जिल्हा स्तरावरुन दिनांक 5 मे ते 15 मे व तालुकास्तरावरुन दिनांक 16 मे ते 25 मे पर्यंत करण्यात याव्यात अशा सुचना दिलेल्या आहेत. तथापि संदर्भीय (2) शासन निर्णय तसेच संदर्भीय (3) चे शासन पत्रान्वये चालू वित्तीय वर्षात दि.31 मे 2020 पर्यंत करावयाच्या सर्वसाधारण बदल्या हया दि.31 जुलै 2020 पर्यंत करण्यात याव्यात असे निर्देश दिलले आहेत.

त्या अनुषंगाने सर्व विभाग प्रमख यांना सुचित करण्यात येते की, संदर्भीय (1) मधील शासन निर्णयानुसार सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही ही दिनांक 09 जुलै, 2020 ते दिनांक- 31 जुलै, 2020 या कालावधीत खालील वेळापत्रकानुसार संपूर्ण बदल्यांची प्रक्रिया पूर्ण करावी.

| अक्र | कार्यसूची | कार्यवाही दिनांक. |
|---|---|---|
| 1 | गट विकास अधिकारी यांनी संवर्गनिहाय वास्तव्य ज्येष्ठता यादी जिल्हा परिषदेस सादर करणे व कर्मचारी यांचे विनंती बदली अर्ज व विकल्प अर्ज, सूट अर्ज सादर करणे | 14.07.2020 |
| 2 | संवर्गनिहाय वास्तव्य सेवाज्येष्ठता याद्या एकत्रित करुन प्रसिध्द करण | 15.07.2020 |
| 3 | वास्तव्य सेवाज्येष्ठता प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप व सुचा मागवण | 15 ते 17 जुलै 2020 |
| 4 | आक्षेप व सुचनांचे निराकरण करुन अंतिम सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करण | 20.07.2020 |
| 5 | प्रत्यक्ष बदली प्रक्रिया समुपदेशनाने पार पाडण | 21 ते 24 जुलै 2020 |

तसेच जिल्हा परिषद कर्मचा-यांचे सर्वसाधारण बदल्या -2020 करिता खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.
1) सर्व विभाग प्रमुख व गट विकास अधिकारी यांना कळविण्यात येते की , जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या जिल्हास्तरीय बदल्यांची कार्यवाही दिनांक 10 जुले 2020 ते दिनांक 24 जुले, 2020 या कालावधीत पूर्ण करण्यात येईल. तसेच, गट विकास अधिकारी यांनी तालुकास्तरीय बदल्यांची कार्यवाही दिनांक 27 जुले, ते दिनांक 31 जुले 2020 या कलावधीत पूर्ण कराव्यात.

2) गट विकास अधिकारी , पंचायत समिती सर्व यांनी शासन निर्णयातील निर्देशानुसार तालुकास्तरीय बदल्यांचा कार्यक्रम निश्चित करुन बदल्यांची कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण करावी.

3) सर्व विभाग प्रमुख / गट विकास अधिकारी / कार्यालय प्रमुख ययांनी त्यांच्या कार्यालयातील सा.प्र.वि. नियंत्रीत वर्ग 3 व वर्ग 4 मधील कर्मचा-यांची बदल्यांची माहिती सामान्य प्रशासन विभागास सादर करावी. तसेच, तालुका / ग्रामीण स्तरावरील कार्यालय प्रमुख यांना सा.प्र.वि. नियंत्रीत वर्ग 3 व वर्ग 4 मधील कर्मचा-यांची माहिती पंचायत समितीस्तरावरील कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्याकडे सादर करण्या बाबत तात्काळ सुचना द्याव्यात. सदर माहिती एकत्रित करुन सामान्य प्रशासन विभागास त्वरीत सादर करावी. सहायक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांच्यावर माहिती संकलीत करुन दिनांक-14.07.2020 पर्यंत सादर करण्याची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

विभाग प्रमुख / गट विकास अधिकारी यांनी कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांना उक्त माहिती, विनंती बदली अर्ज, सूट अर्ज , विकल्प संकलीत करुन सामान्य प्रशासन विभागात दिनांक -14/7/2020 रोजी दुपारी 04.00 उपस्थित रहाण्या बाबत सक्त सुचना दयाव्यात. सदर कामी विलंब अथवा दिरंगाई होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सोबत :- 1) प्रपत्र

2) विनंती बदली अर्ज नमुना

13/7/20

(पृथ्वीराज बी.पी. भापसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,परभणी

प्रत - सहायक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विभाग / पंचायत समिती.यांना उचित कार्यवाहीस्तव
(मार्फत कार्या. प्रमुख)